७. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, वेळोवेळीं, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन, सदहू जकात घेण्याच्या कारणांसाठीं, सदरीं सांगितलेल्या सगळ्या मालाच्या किंवा त्यांपैकीं कोणत्याही विवक्षित प्रकारच्या किंवा प्रकारांच्या मालाच्या तारिफकिंमती ठरविण्याचा व त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या तारिफ-किंमतींत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

अशा मालाच्या तारिफ-किंमती ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस अधिकार.

(२) सदहू प्रकारची तारिफ-किंमत ज्या मालास लागू असेल त्या मालाची ती किंमत ह्या आक्टाच्या कारणांसाठीं "खरी किंमत" होय असें समजावें; परंतु सदरील प्रसंग शिवायकरून इतर प्रसंगीं, ह्या आक्टाअन्वयें सगळ्या मालाचा आकार त्याच्या खऱ्या किंमतीप्रमाणें ठरविला पाहिजे.

(३) ह्या आक्टाच्या कारणांसाठीं, खरी किंमत ह्याचा अर्थ,

(अ) सदहू मालाच्या जातीचा व प्रतीचा माल त्याच्या बनवण्याच्या जागीं आणि वेळीं ज्या घाऊक रोख किंमतीस विकण्यांत येतो अगर विकतां येतो, त्या किंमतींतून, तो माल बनविल्याबद्दल पडणाऱ्या जकातीच्या रकमेशिवाय इतर कोणतीही रकम वाद अगर कमी न करितां वर्तवळा बाद करून जी रकम बाकी राहील ती रकम, असा समजावा;

(ब) अशी किंमत नक्की ठरवतां येत नसेल त्या प्रसंगीं, सदर्हू प्रकारच्या मालाच्या जातीचा अगर प्रतीचा जो माल अशा जागीं ज्या किंमतीस स्वाधीन करितां येत असेल, त्या किंमतींतून सदरीं सांगितल्या प्रकारची (जकातीची) रकम शिवाय करून इतर कोणतीही रकम वाद अगर कमी न करितां जी रकम बाकी राहील ती रकम, असा समजावा.

गिरणीच्या मालकांनीं बनवलेल्या मालाचें माही पत्रक देण्याबाबद.

८. (१) प्रत्येक गिरणीच्या मालकानें, प्रत्येक महिन्यास, आपल्या गिरणींत मागील महिन्यामध्यें बनवलेल्या सगळ्या कापसाच्या मालाचें एक पत्रक तयार करून किंवा करवून तें कलेक्टराकडे दिलें पाहिजे अगर देवविलें पाहिजे, आणि त्या पत्रकांतील मजकूर खरा असल्याबाबदचा इकरार त्या पत्रकाच्या शेवटीं करून त्याखालीं आपली सही केली पाहिजे.

(२) ह्या आक्टाखालील कानूंमध्यें अन्यरीतीनें फर्मावण्यांत येतील ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, अशा प्रत्येक पत्रकांत, तें पत्रक ज्या मुदतीबद्दलचें असेल, त्या मुदतींत दरेक जातीचा किती माल बनविण्यांत आला तें आणि अशा मालाची खरी किंमत किती आहे तें, लिहिलें असलें पाहिजे.

(३) अशा प्रत्येक पत्रकांत, ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूअन्वयें ठरविण्यांत येईल ती जास्त माहिती असून तें पत्रक तशा कानूंअन्वयें ठरविण्यांत येईल त्या नमुन्यावरहुकुम असलें पाहिजे आणि त्याचप्रमाणें, पत्रकाच्या खरेपणाची खात्री करण्याबाबद व इतर कांहीं बाबतींबाबद त्या कानूंत ठरविण्यांत येतील त्या अटींस तें पात्र असलें पाहिजे.

(४) असें दरेक पत्रक, तें ज्या मुदतीबद्दलचें असेल त्या मुदतीनंतरच्या काम करण्याच्या तीन दिवसांच्या आंत व फार झालें तर सात दिवसांच्या आंत कलेक्टराच्या स्वाधीन केलें पाहिजे अगर त्याच्या पत्त्यावर टपालांतून पाठविलें पाहिजे; आणि ह्या पत्रकांपैकीं पहिलें पत्रक फेब्रुवारी १८९६ ह्या महिन्याबद्दल तयार करून त्यांत ह्या आक्टाच्या सुरुवातीपासून बनविण्यांत आलेल्या सगळ्या मालाचा समावेश केला पाहिजे.

खुलासा.—ह्या पोटकलमांत "काम करण्याचा दिवस" ह्याचा अर्थ, सन १८८१ चा बेचनी दस्तऐवजांबाबद आक्ट, ह्याच्या २५ व्या कलमांत व्याख्या केलेला सार्वजनिक सणाचा दिवस शिवायकरून इतर दिवस असा आहे.

जकात आकारण्याबाबद आणि ती भरण्याच्या नोटिशीबाबद.

९. (१) सदर्हू पत्रक ज्या मुदतीबद्दल असेल, त्या मुदतीसाठीं कांहीं जकात घेण्याजोगी असली तर त्या कलेक्टरानें ती आकारिली पाहिजे, आणि तिची रकम ताबडतोब भरण्यांत आली नाहीं तर, ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूंअन्वयें ठरविण्यांत येईल त्या नमुन्यावरहुकुम एक नोटीस मालकावर बजाविली पाहिजे; त्या नोटिशींत, आकारलेली रकम नोटीस बजाविल्याच्या तारिखेपासून दाहा दिवसांच्या आंत भरली पाहिजे असें फर्माविलेलें असलें पाहिजे.

(२) पोट कलम (१) ह्याखालील नोटीस गिरणीच्या मालकावर बजवावयाची ती, तिची एक नकल त्या मालकास अथवा त्याच्या एजंटास त्याच्या नेहमींच्या काम करण्याच्या जागीं देऊन अथवा द्यावयास काढून, अगर असें करण्याची सोय नसेल तर, त्या नोटिशीची एक नकल त्या गिरणीच्या बाहेरील दरवाजांपैकीं एका दरवाजावर लावून, बजावण्याचा अधिकार आहे.

मुख्य आक्टाचीं विवक्षित कलमें ह्या आक्टाअन्वयें जकात आकारण्याच्या व वसूल करण्याच्या कामीं लागू करण्याबाबद.

१०. मुख्य आक्टांतलीं ३१ ते ३४ हीं चार कलमें, ३७ वें कलम, व ३९ ते ४१ हीं तीन कलमें, ह्या आक्टाअन्वयें बसविलेली जकात आकारण्याच्या व वसूल करण्याच्या कामीं लागू आहेत.

मात्र असें ठरविलें आहे कीं, जो कोणताही माल ह्या आक्टांत पुढें ठरविलेल्या रीतीनें वखारींत सांठवून ठेविलेला नसेल, त्या मालास, सदर्हू कलम ३७ ह्यांत ठरविल्याप्रमाणें पत्रक देतेवेळीं जो जकातीचा दर व जी तारिफ-किंमत अमलांत असेल तो दर व ती किंमत लागू न होतां, तो माल बनवण्यांत आला त्यावेळीं अमलांत असलेला दर व किंमत हीं लागू होतील.

न भरलेली जकात वसूल करण्याबाबद.

११. (१) ह्या आक्टाअन्वयें द्यावयाची कोणतीही जकात जर, ती भरण्यासाठीं सदर्हू प्रकारच्या कोणत्याही नोटिशींत ठरविलेल्या मुदतीच्या आंत भरली नाहीं, तर, तिच्या बदला, कलेक्टरास, त्याच्या नजरेस येईल त्याप्रमाणें, त्या न भरलेल्या रकमेच्या दुपटीहून जास्त नाहीं इतकी त्यास वाजवी वाटेल ती कोणतीही रकम, वसूल करण्याचा अधिकार आहे.

(२) पोटकलम (१) ह्याअन्वयें वसूल करावयाच्या सर्व रकमा, सन १८८६ चा आक्ट २ रा, कलम ३०, पोट कलमें (१), (२) व (३), ह्यांत सांगितलेल्या रकमांच्या बाबतींत जी रीत त्या पोटकलमांत सांगितली आहे, त्या रीतीनें वसूल केल्या पाहिजेत.

### वखारींत माल भरून ठेवणें.

माल भरून ठेवण्यासाठीं वखारींस परवाने देण्याबाबद आणि त्यांबद्दल फी घेण्याबाबद.

१२. (१) कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यास, वेळोवेळीं, कोणतीही खोली किंवा जागा, कापसाचा माल भरून ठेवण्याची वखार ह्मणून वापरण्यासाठीं परवाना देण्याचा अधिकार आहे; आणि ह्या आक्टाच्या कारणांसाठीं, अशी दरेक जागा अगर खोली मुख्य आक्टाअन्वयें वखार होय असें, आणि तिच्याबद्दल त्या आक्टाअन्वयें योग्य रीतीनें लैसेन्स दिलेला आहे असें, समजलें पाहिजे.

(२) मुख्य आक्टाअन्वयें परवाना दिलेल्या खासगी वखारीच्यासंबंधानें त्या त्या वेळीं जी परवाना-फी व इतर रकमा द्याव्या लागत असतील तशी फी व इतर रकमा सदर्हू प्रकारच्या प्रत्येक वखारीच्यासंबंधानें दिल्या पाहिजेत;

मात्र असें ठरविलें आहे कीं, कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यास, कोणत्याही विवक्षित वखारीसंबंधाच्या सदर्हू प्रकारच्या कोणत्याही फी अगर इतर रकमा पूर्णपणें अगर अंशतः माफ करण्याचा अधिकार आहे.

माल वखारींत भरून ठेवण्याच्या परवानगीबाबद.

१३. (१) कोणत्याही गिरणीच्या मालकास, जो कोणताही माल कलम ६ अन्वयें जकात दिली जाण्यास पात्र झालेला असून ज्या मालावर ९ व्या कलमाअन्वयें जकात आकारलेली नसेल, तो माल एखाद्या वखारींत भरून ठेवण्याच्या परवानगीसाठीं अर्जी करण्याचा अखत्यार आहे.

(२) अशी अर्जी लेखी असून तिजवर अर्जदाराची सही असली पाहिजे, आणि ती कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यानें ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें असली पाहिजे.

ह्या रीतीनें भरून ठेविलेल्या मालास मुख्य आक्टाच्या ११ व्या बाबींतले ठराव लागू होण्याबाबद.

१४. कलम १३ अन्वयें ज्या मालाच्या संबंधानें अर्जी करण्यांत आलेली असेल त्या मालाच्या जातीच्या आयात केलेल्या मालास मुख्य आक्टाच्या ११ व्या बाबीचे सर्व ठराव ज्या मानानें लागू असतील त्या मानानें ते सर्व ठराव त्या सगळ्या मालास लागू होतील.

ह्या रीतीनें भरून ठेविलेल्या मालावर जकात न आकारण्याबाबद.

१५. जेव्हां कोणताही माल वखारींत भरून ठेवण्यांत येईल तेव्हां, त्या मालाचें परिमाण व इतर तपशील हीं, तो माल ज्या मुदतींत तयार केलेला असेल त्या मुदतीबद्दल ८ व्या कलमाअन्वयें पाठविण्याच्या पत्रकांत अगर त्याच मुदतीबद्दल एक निराळें पत्रक तयार करून त्यांत दाखल करून, तो माल सदर्हूप्रमाणें वखारींत भरून ठेविला ह्मणून निर्दिष्ट केलें पाहिजे; आणि जकात आकारून वसूल करितांना तो माल बाद केला पाहिजे.

## तपासणी.

गिरण्या तपासण्यास व कागदपत्रांच्या व हिशोबाच्या नकला घेण्यास कलेक्टरास अधिकार.

१६. (१) कलेक्टरास अगर स्थानिक सरकारानें ह्यासाठीं योग्यरीतीनें नेमलेल्या कोणत्याही अमलदारास, कामाच्या तासांत सर्व वाजवी वेळीं, कोणत्याही गिरणींत, आणि ह्या बाबतींत स्थानिक सरकारानें केलेल्या कोणत्याही हुकुमास पात्र राहून कोणत्याही गिरणीच्या कोणत्याही भांगांत जाण्यायेण्याची मोकळीक असली पाहिजे.

(२) कोणतेंही पत्रक खरें आहे किंवा नाहीं तें पाहण्यासाठीं, अगर, ह्या आक्टाच्या किंवा त्याखालील कोणत्याही कानूंच्या कारणांकरितां ज्या कोणत्याही बाबतींसंबंधानें माहिती पाहिजे असेल त्या त्या बाबतींविषयीं माहिती मिळविण्यासाठीं, सदर्हू प्रकारच्या कोणत्याही अमलदारास, कोणत्याही वेळीं, मालकास नोटीस देऊन किंवा दिल्यावांचून, कोणत्याही गिरणींत चाललेल्या कामासंबंधाचे कागदपत्र आणि विकरीच्या व जमाखर्चाच्या वह्या तपासण्याचा आणि त्या सर्व किंवा कोणत्याही कागदपत्रांच्या अगर वह्यांच्या नकला अगर उतारे घेण्याचा अधिकार आहे.

(३) कोणत्याही गिरणीच्या मालकास, ज्या कोणत्याही कागदपत्रांत अगर हिशोबांत एकाद्या व्यापारी हुन्नराचें वर्णन किंवा संक्षिप्त रीत लिहिलेली असेल ते कागदपत्र अगर हिशोब कलेक्टराहून कमी दरज्याच्या कोणत्याही अमलदाराकडे रुजू करण्यास हरकत घेतां येईल.

पण जर तो मालक, असे कागदपत्र अगर हिशोब, त्यांत व्यापारी हुन्नराचें वर्णन किंवा संक्षिप्त रीत आहे ह्या कारणावरून अशा अमलदाराकडून तपासले जाण्यास हरकत घेईल, तर, त्यानें ती हरकत, कलेक्टराकडे पाठविण्यासाठीं, त्या अमलदाराकडे लेखी रुजू केली पाहिजे, आणि त्या अमलदारास, कलेक्टरचा हुकुम येई तोंपर्यंत, ते कागदपत्र अगर हिशोब तावडतोब तेथच्या तेथें मोहरबंद करून ठेवण्याचा अधिकार आहे.

मिळविलेली माहिती सन १८८९ चा १५ वा आक्ट ह्याच्या अर्थाअन्वयें सरकारी गुप्त गोष्ट समजण्याबाबद.

१७. (१) सदर्हू प्रकारच्या सर्व नकला व उतारे व सदर्हू प्रकारच्या कोणत्याही अमलदारानें कोणतीही गिरणी किंवा वखार तपासून मिळविलेली इतर सर्व माहिती अगदीं न फोडायाची अशी समजून सरकारी गुप्त गोष्ट समजली पाहिजे.

(२) जर कोणताही सदर्हू प्रकारचा अमलदार आपल्या वरिष्ठ अमलदाराशिवाय इतर कोणत्याही मनुष्यास वर सांगितल्याप्रकारची कोणतीही सरकारी गुप्त गोष्ट कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्याची लेखी संमति आधीं मिळविल्याशिवाय कळवील, तर तो हुद्याच्या संबंधानें विश्वासघात केल्याबद्दल गुन्हेगार होईल; आणि त्यावर त्या गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव झाला असतां तो सन १८८९ चा हिंदुस्थानचा सरकारी गुप्त गोष्टींबाबद आक्ट, कलम ४, ह्यांत ठरविल्याप्रमाणें शिक्षेस पात्र होईल.

(३) सदरीं शेवटीं उल्लेख केलेल्या आक्टाच्या ९ व्या कलमांत ठेविलेला निर्बंध, हुद्याच्या संबंधानें विश्वासघात केल्याबद्दलच्या ह्या आक्टाअन्वयें चालवावयाच्या फौजदारी कामास लागू होणार नाहीं.

## निर्गत करणें व ड्राब्याक.

जकातीस पात्र असलेला माल पारक्या बंदरास निर्गत करणें असेल तेव्हां सर्टिफिकेट देण्याबाबद.

१८. जर कोणताही जकातीस पात्र असलेला माल, त्याबद्दलचें पत्रक कलम ८ अन्वयें कलेक्टराकडे दिलें जाण्याच्या आधीं, जलमार्गानें कोणत्याही पारक्या बंदरीं निर्गत करण्यांत आला तर, तो माल ज्या गिरणींत बनविण्यांत आला असेल त्या गिरणीच्या मालकास, तो माल ज्या बंदरीं तारवावर चढविला असेल त्या बंदराच्या कलेक्टराकडे लेखी अर्जी करतां येईल; आणि तो माल बाहेर पाठविण्यासाठीं खरोखर तारवावर चढविला आहे अशी त्या कलेक्टराची खातरी झाली तर, त्यानें, त्या मालाचें परिमाण व इतर तपशील दाखल करून व तो माल सदर्हू कारणासाठीं खरोखर तारवावर चढविण्यांत आला आहे असें लिहून एक सार्टीफिकेट त्या मालकास दिलें पाहिजे.

सर्टिफिकेट दिलें ह्मणजे मालावर जकात माफ करणें.

१९. कलम १८ ह्याअन्वयें कोणत्याही सर्टिफिकेटासाठीं अर्ज करण्यांत आला ह्मणजे, त्यांत मालाचें जें परिमाण व त्याचा जो तपशील दाखल केलेला असेल त्या वजनाचा व तपशिलाचा माल सदर्हूप्रमाणें तारवावर चढविण्यांत आला आहे असें, तो माल ज्या मुदतींत तारवावर चढविण्यांत आला असेल त्या मुदतीनंतरची नाहीं अशा कोणत्याही मुदतीबद्दल ८ व्या कलमाअन्वयें पाठवावयाच्या पत्रकांत, लिहिलें पाहिजे. आणि तो माल त्याप्रमाणें तारवावर चढविण्यांत आला आहे अशी, आणि, ह्या आक्टाखालील कानूंत कांहीं शरती घालून दिलेल्या असल्यास, त्या पाळण्यांत आलेल्या आहेत अशी, कलेक्टरची खातरी झाल्यास जकात आकारून वसूल करितांना तो माल बाद करण्यांत येईल.

पारक्या बंदरांस निर्गत केलेल्या मालाबद्दल दिलेली जकात परत देण्याबाबद.

२०. (१) जकातीस पात्र असलेला कोणताही माल कस्टम्सच्या कोणत्याही बंदराहून कोणत्याही पारक्या बंदरास जलमार्गानें निर्गत करण्यांत आला तर, त्या मालाबद्दल ह्या आक्टाअन्वयें जी कोणतीही जकात दिलेली असेल, ती जकात ड्राब्याक ह्मणून परत मिळण्याविषयीं, तो माल ज्या बंदरीं तारवावर चढविला असेल त्या बंदराच्या कस्टम्स कलेक्टराकडे तो माल पाठविणाराला अर्ज करितां येईल.

(२) पोटकलम (१) ह्याअन्वयें करावयाच्या प्रत्येक अर्जांत, अर्जदारानें, ज्या मालाच्या संबंधानें ड्राब्याक मागितलेला असेल, त्या मालाचें वर्णन आणि तो माल ज्या गिरणींत बनविलेला असेल त्या गिरणीचें नांव आणि तो बनविल्याच्या देतां येतील तेवढ्या जवळच्या तारखा व जी इतर कोणतीही जास्त माहिती देण्याविषयीं ठरविण्यांत येईल ती माहिती, हीं लिहिलीं पाहिजेत.

अशी जकात केव्हां परत द्यावी त्याबाबद.

२१. (१) ज्या मालाच्या बाबतींत ड्राब्याक मागितलेला असेल त्या मालाबद्दल, तो निर्गत करण्यासाठीं ज्या तारखेस तारवावर चढविलेला असेल त्या तारखेच्या पूर्वीं बारा महिन्यांच्या आंत जकात देण्यांत आलेली आहे अशी, आणि ह्या आक्टाखालील कानूंत कांहीं शरती घालून दिलेल्या असल्यास त्या पाळण्यांत आल्या आहेत अशी कलेक्टरची खातरी होईल असें दाखविण्यांत आलें तर, त्यानें ड्राब्याक दिला पाहिजे.

(२) ज्या मालाच्या बाबतींत ड्राब्याक मागितलेला असेल, तो माल ६ व्या कलमाच्या अर्थाअन्वयें बनवण्यांत आल्यानंतर ओपण्यांत आलेला आहे, रंगवण्यांत आलेला आहे अगर छापण्यांत आलेला आहे एवढ्याच कारणावरून तो ड्राब्याक देण्यांत येणार नाहीं असें समजूं नये.

विवक्षित बंदरांस निर्गत केलेल्या मालाच्या बाबतींत जकात परत देण्याची मनाई करण्याचा अधिकार.

२२. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, वेळोवेळीं, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन, कोणत्याही विवक्षित पारक्या बंदरास निर्गत केलेल्या मालाबद्दल ड्राब्याक देण्याची मनाई करण्याचा अधिकार आहे.

(२) सन १८९४ चा कापसाच्या मालावरील जकातीबाबदचा आक्ट ह्याच्या २२ व्या कलमाअन्वयें काढलेला कोणताही जाहिरनामा ह्या आक्टाअन्वयें काढलेला आहे असें समजलें पाहिजे.

विवक्षित बाबतींत जकात परत न देण्याबाबद.

२३. ह्या आक्टांत कोणतेही ठराव असले तरी, ज्या कोणत्याही कापसाच्या मालावर जकात दिलेली असेल, त्या मालाबद्दल खालील प्रसंगीं ड्राब्याक देण्यांत येणार नाहीं; ह्मणजे—

(अ) त्या मालाची किंमत, मागितलेल्या ड्राब्याकचे रकमेहून कमी असेल तेव्हां; अगर

(ब) तारवावर एकाच खेपेस चढविलेले मालाबाबद मागितलेली ड्राब्याक पांच रुपयांहून कमी असेल तेव्हां.

मुख्य आक्टाचीं कलमें ५१ व ५२ हीं ह्या आक्टाखालील दाव्यांस लागू करण्याबाबद.

२४. मुख्य आक्टाचीं ५१ व ५२ हीं कलमें, ह्या आक्टाअन्वयें ड्राब्याकसाठीं केलेल्या प्रत्येक दाव्यास लागू आहेत असें समजावें.

## अपराध व शिक्षा.

अपराधांबद्दल शिक्षा.

२५. खालीं लिहिलेल्या यादीचे पहिले आसनांत अपराध लिहिले आहेत त्यांबद्दल, त्या अपराधांच्या संबंधानें त्याच यादीचे दुसरे आसनांत लिहिल्या आहेत तेथवर शिक्षा होतीलः—

| | |
|---|---|
| १. ह्या आक्टाअन्वयें केलेली कोणतीही कानू तोडणें. | पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंड. |
| २. ह्या आक्टाअन्वयें जकातीस पात्र असलेल्या कोणत्याही मालावरची जकात अगर तिचा कोणताही भाग देण्याचें चुकविण्याच्या इराद्यानें तो माल छपवणें, छपवण्याचा प्रयत्न करणें, किंवा जाणूनबुजून छपवूं देणें अगर दुसऱ्याकडून छपवणें. | असा माल सरकारदाखल केला जाण्यास पात्र होईल, आणि हा अपराध ज्यावर शाबीत होईल तो मनुष्य, त्या मालाच्या किंमतीच्या तिपटीपर्यंत रक्कम दंडादाखल देण्यास पात्र होईल. |
| ३. कलम ८ ह्याअन्वयें तयार करावयाचें कोणतेंही पत्रक तयार करावयास चुकणें किंवा तशा पत्रकावर सही करण्यास किंवा तें पुरें करण्यास नाकारणें. | एक हजार रुपयेपर्यंत दंड. |
| ४. असें कोणतेंही पत्रक तयार करणारास जी जी माहिती असेल व जें जें वाटत असेल त्या माहितीप्रमाणें व वाटण्याप्रमाणें खरा नाहीं असा मजकूर दाखल करून तें पत्रक तयार करणें व तें देणें. | हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या १९९ व्या कलमांत, इकरारांत खोटा मजकूर लिहिण्याबद्दल ठरविलेली शिक्षा. |
| ५. महसुलाचें कपटानें नुकसान करण्याच्या इराद्यानें, गिरणींत ठेवलेले कोणतेंही कागदपत्रांत अगर जमाखर्चाच्या वह्यांत फेरफार करणें किंवा त्या खोट्या करणें. | हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या ४६५ व्या कलमांत बनाऊ लेख करण्याबद्दल ठरविलेली शिक्षा. |
| ६. कलम २८ ह्यांत ठरविल्याप्रमाणें, नमुने ठेवण्यांत, वाजवी कारणाशिवाय, कसूर करणें. | प्रत्येक अपराधाबद्दल दोनशें रुपयेपर्यंत दंड. |
| ७. ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूंत ठेवण्यास सांगितलेले योग्य कागदपत्र व जमाखर्चाच्या वह्या न ठेवणें. | पांचशें रुपयेपर्यंत दंड आणि शाबितीच्या ठरावाच्या तारिखेनंतर जितके दिवस पर्यंत तो अपराध चालू ठेविला जाईल त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी वीस रुपये दंड. |
| ८. जें कोणतेंही पत्रक ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूअन्वयें तयार करून देणें भाग आहे तें पत्रक तयार करण्यास व देण्यास चुकणें. | एक हजार रुपयेपर्यंत दंड. |

| | |
|---|---|
| ९. ह्या आक्टाअन्वयें दिलेले कोणतेही अधिकार कोणताही कलेक्टर अगर इतर अमलदार चालवीत असतांना त्याला जाणूनबुजून हरकत करणें. | पराकाष्ठा साहा महिनेपर्यंत कैद अगर एक हजार रुपयेपर्यंत दंड अगर दोन्ही शिक्षा. |
| १०. ज्या मालाच्या संबंधानें कलम १८ अन्वयें सर्टिफिकेट मिळालेलें असेल, किंवा जो माल निर्गत करावयाचा ह्मणून नोंदल्यावर त्याची ड्राव्याक दिलेली असेल, तो माल योग्य रीतीनें निर्गत केला नसेल अथवा मुख्य आक्टांतील ठरावांअन्वयें योग्य रीतीनें जमिनीवर उतरल्याशिवाय अगर डिश्चार्ज केल्याशिवाय कस्टम्सचे कोणतेही बंदरीं तारवावरून उतरला असेल किंवा पुनः जमिनीवर उतरला असेल तर. | सदर्हू प्रकारचा माल व तो सदर्हूप्रमाणें तारवांतून उतरण्यासाठीं किंवा पुनः जमिनीवर उतरण्यासाठीं उपयोग केलेलें कोणतेही तारूं सरकारदाखल केलें जाण्यास पात्र होईल; आणि ज्या तारवांतून सदर्हू प्रकारचा माल सदर्हूप्रमाणें उतरला असेल अगर पुनः जमिनीवर उतरला असेल त्या तारवाचा मास्तर आणि ज्या कोणत्याही मनुष्यानें किंवा ज्याचे हुकुमावरून किंवा ज्याचेद्वारें सदर्हू प्रकारचा माल सदर्हूप्रमाणें तारवावरून उतरला असेल, किंवा पुनः जमिनीवर उतरला असेल, अगर जो सदर्हूप्रमाणें तारवावरून उतरण्यांत किंवा पुनः जमिनीवर उतरण्यांत मदत करील अगर सामील असेल, तो मनुष्य सदर्हूप्रकारचे मालाच्या किंमतीच्या पराकाष्ठा तिपटीपर्यंत किंवा पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल. |
| ११. ज्या कोणत्याही मालाबद्दल ड्राव्याक मागितलेला असेल, त्या मालाची किंमत ड्राव्याकच्या रकमेपेक्षां कमी असेल तर. | असा माल सरकारदाखल केला जाण्यास पात्र होईल. |
| १२. कोणताही माल कोणत्याही गिरणींतील कोणत्याही जागीं, पेटींत किंवा बंद केलेल्या पात्रांत छपविलेला सांपडेल, आणि त्याविषयीं कलेक्टरास खातरीलायक असा योग्य जाब देण्यांत येणार नाहीं तर. | असा माल सरकारदाखल केला जाण्यास पात्र होईल. |
| १३. पत्रकांत दाखल केलेल्या मालाहून कोणताही जास्त माल किंवा त्या पत्रकांतील तपशिलाशीं जुळत नाहीं असा माल कोणत्याही गिरणीमध्यें सांपडेल तर. | असा माल सरकारदाखल केला जाण्यास पात्र होईल किंवा कस्टम्सचा मुख्य अधिकारी फर्मावील तितकी जास्त जकात त्यावर घेतली जाईल. |
| १४. कोणताही कापसाचा माल मोजून किंवा प्याकेजाप्याकेजानें पसार केला असेल तेव्हां महसुलाची कोणतीही नुकसानी होण्यासारखी कोणतीही | अशी कसूर केल्याचा किंवा खोटा तपशील सांगितल्याचा जो मनुष्य अपराधी असेल तो सदर्हू प्रकारच्या कसूरीनें किंवा खोटा तपशील सांगितल्यानें सरकारची |

| | | |
|---|---|---|
| | कसूर केली किंवा खोटा तपशील सांगितला असें आढळेल तर. | जितकी जकात बुडाली असती, तितक्या जकातीचे दसपटीपर्यंत दंडास पात्र होईल. परंतु फरक पडला तो आकस्मिक रीतीनें पडला असें कलेक्टराचे किंवा इतर अमलदाराचे खातरीलायक रीतीनें शाबित करण्यांत आलें तर तो सदहू दंडास पात्र होणार नाहीं. |
| | १०. जो कोणताही कलेक्टर अगर त्याच्या ताब्यांतला कोणताही अमलदार ह्या आक्टाविरुद्ध किंवा ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूविरुद्ध अगर हुकुमाविरुद्ध कोणतेंही कृत्य करील अगर कोणतीही कसूर करण्याचा अपराध करील, किंवा कोणत्याही मनुष्यास नुकसान करण्याच्या किंवा त्रास देण्याच्या इरादानें त्याला ह्या आक्टाअन्वयें दिलेल्या कोणत्याही अधिकाराचा त्रासदायक रीतीनें व जरूरी नसतां उपयोग करील तर. | असा कलेक्टर किंवा अमलदार त्यावर गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव झाला असतां पांचशें रुपयेपर्यंतच्या दंडास पात्र होईल. |
| | १६. जकातीस पात्र असलेला माल वखारींत भरून ठेवण्यासंबंधानें मुख्य आक्टाचें कलम १६७, परिशिष्टाचे नंबर ४१–५३ (दोन्ही धरून) ह्यांत सांगितलेले अपराध. | त्याच परिशिष्टांत त्या त्या अपराधास सांगितलेल्या शिक्षा. |

कोणत्या माजिस्ट्रेटास हुकुमत आहे त्याबाबद.

२६. कोणत्याही जिल्हा माजिस्ट्रेटास किंवा प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास किंवा पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास ह्या आक्टाविरुद्ध करण्यांत आलेल्या गुन्ह्यांचा संक्षिप्त रीतीनें इन्साफ करण्याचा अधिकार आहे.

मुख्य आक्टाचें कलम १६८ वें, ह्या आक्टाअन्वयें सरकारदाखल केल्याच्या प्रकरणांस लागू करण्याबाबद.

२७. मुख्य आक्टाचें कलम १६८ हें ह्या आक्टाअन्वयें ज्या ज्या बाबतींत माल सरकारदाखल करण्यांत येईल त्या त्या बाबतींस लागू आहे असें समजावें.

## किरकोळ

विवक्षित माल बनविण्यांत येत असतांना गिरण्यांच्या मालकांनीं नमुने घेण्याबाबद आणि ते तपासणीसाठीं मिळण्याबाबद.

२८. (१) दरेक गिरणीच्या मालकानें, ज्या मालाची तारिफ-किंमत ७ व्या कलमाअन्वयें ठरविलेली असेल तो माल शिवायकरून इतर कोणत्याही मालाच्या बाबतींत, तो माल बनविण्यांत येत असतांना, त्याचा एक अगर अनेक नमुने घेतले पाहिजेत, आणि ते नमुने, तो माल तयार झाल्यानंतर निदान साहा महिनेपर्यंत, पाहण्यासाठीं, राखून ठेविले पाहिजेत.

(२) असे नमुने, कलेक्टरास अगर १६ व्या कलमाअन्वयें त्यानें नेमिलेल्या कोणत्याही अमलदारास तपासण्यासाठीं सर्व वेळीं मिळण्यासारखे असले पाहिजेत; आणि तो माल सोईनें तपासतां येत नसेल तेव्हां अशा नमुन्यांची तपासणी, मुख्य आक्टाच्या ३१ व्या कलमाच्या अर्थाअन्वयें, त्या मालाची तपासणी होय असें समजलें पाहिजे.

(३) अमुक निर्दिष्ट केलेल्या बाबतींत, ह्या कलमाच्या कारणांसाठीं, कोणता नमुना पुरेसा नमुना समजावा तें कानू करून ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस अधिकार आहे.

२९. (१) कोणताही माल तपासण्यासाठीं, अगर त्याची किंमत नक्की ठरवण्यासाठीं अगर इतर कोणत्याही जरूरीच्या कारणासाठीं, कलेक्टरास अगर कलम १६ अन्वयें नेमिलेल्या कोणत्याही अमलदारास त्या मालाचे नमुने कोणत्याही वेळीं घेण्याचा अधिकार आहे. — कलेक्टरास नमुने घेण्याचा अधिकार.

(२) कोणत्याही मालकास कोणताही नमुना १६ व्या कलमाअन्वयें नेमिलेल्या कोणत्याही अमलदाराच्या स्वाधीन करण्यास हुकुम करण्यांत आला ह्मणजे, त्या मालकानें तो नमुना एखाद्या कव्हरांत घालून त्यावर कलेक्टराचें नांव घातलें असतां व शिक्का केला असतां चालेल. आणि अशा प्रसंगीं त्या अमलदारानें, तें कव्हर, आंखबंद, कलेक्टराच्या स्वाधीन केलें पाहिजे.

(३) दरेक नमुना, साधल्यास, त्याच्या मालकास परत दिला पाहिजे अगर त्या मालकाची तशी मर्जी असल्यास कलेक्टरानें तो विकून त्याचें जें उत्पन्न येईल त्याचा त्या मालकास हिशोब दिला पाहिजे.

३०. प्रत्येक गिरणीच्या मालकानें, ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूमध्यें ठरविण्यांत येतील ते सर्व कागदपत्र व जमाखर्चाच्या वह्या ठेविल्या पाहिजेत. — गिरण्यांच्या मालकांनीं कागदपत्र व हिशोब ठेविले पाहिजेत.

३१. हस्तश्रमाशिवाय इतर रीतीनें चालविण्यांत येत असलेल्या यंत्रांनीं ज्या गिरणींत अगर इतर जागीं सूत कांतण्यांत येत असेल त्या गिरणीच्या अगर जागेच्या मालकानें, असें सूत किती व कोणत्या जातीचें कांतण्यांत आलें त्याबद्दलचीं मुदतीमुदतीचीं पत्रकें, ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूंत सांगितलेल्या नमुन्याबरहुकुम, त्या तपशिलासहित आणि तितक्या मुदती मुदतीनें, कलेक्टराकडे रुजू केलीं पाहिजेत. — यंत्रानें कांतलेल्या सुताबद्दल मुदती मुदतीचीं पत्रकें गिरण्यांच्या मालकांनीं रुजू केलीं पाहिजेत.

३२. मुख्य आक्टाचीं कलमें १६९, १७०, १७७, १८२, १८४, १८५, १८७, १९०, १९१ व १९३ हीं शिवायकरून त्या आक्टाच्या १७ व्या बाबींतले सर्व ठराव, ह्या आक्टाअन्वयें चालविलेल्या कामास लागू होतील. — मुख्य आक्टाच्या कित्येक कलमांतील ठराव ह्या आक्टाअन्वयें चालू केलेल्या कामास लागू करण्याबाबद.

३३. ह्या आक्टाअन्वयें दिलेल्या कोणत्याही निकालावरून किंवा केलेल्या कोणत्याही हुकुमावरून नुकसान झालेल्या कोणत्याही मनुष्यानें अर्जी केली असतां स्थानिक सरकारास तो निकाल अगर हुकुम रद्द करण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा अधिकार आहे. — ह्या आक्टाखालील हुकूम रद्द करण्यास किंवा त्यांत फेरफार करण्यास स्थानिक सरकारास अधिकार.

३४. मुख्य आक्टाच्या १९८ व्या २०१ व्या, २०४ थ्या, २०५ व्या व २०६ व्या कलमांतील ठराव ह्या आक्टांत दाखल केले आहेत असें समजावें. — मुख्य आक्टांतील विवक्षित ठराव ह्या आक्टांत दाखल करण्याबाबद.

३५. सन १८९४ चा हिंदुस्थानचा तारिफाचा आक्ट ह्याच्या १० व्या कलमांतले ठराव ह्या आक्टाअन्वयें कापसाच्या मालावर बसविलेल्या जकातीस लागू होतील. — सन १८९४ च्या ८ व्या आक्टाचें १० वें कलम ह्या आक्टाखालील जकातीस लागू करण्याबाबद.

३६. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, खालील कारणांसाठीं, ह्या आक्टाअन्वयें वेळोवेळीं कानू करण्याचा अधिकार आहे; ह्मणजे— — गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस कानू करण्याचा अधिकार.

(अ) ह्या आक्टावरून अगर ह्या आक्टाअन्वयें द्यावयाच्या कोणत्याही पत्रकाचा नमुना, आणि त्या प्रत्येकांत दाखल करावयाचा तपशील, आणि त्याच्या खरेपणाबद्दल खात्री करून घेण्याची रीत, आणि त्याच्या संबंधानें ज्या कोणत्याही इतर अटी जरूर असतील त्या सर्व अटी, हीं ठरविण्यासाठीं ;

(ब) कांतलेल्या सुताचीं पत्रकें मागण्यासाठीं ;

(क) कलेक्टरानें कलम ९ अन्वयें द्यावयाच्या नोटिशीचा नमुना ठरविण्यासाठीं;

(ड) गिरण्यांची तपासणी, आणि तिच्या संबंधाचे कलेक्टरांचे व इतर अमलदारांचे अधिकार व कामें, ह्यांचें नियमन करण्यासाठीं;

(इ) ह्या आक्टाअन्वयें वखारी ठेवणें आणि त्या वखारींत माल भरून ठेवणें व त्यांतून तो माल बाहेर काढणें आणि त्या संबंधाचे कलेक्टराचे अधिकार व कामें, ह्यांचें नियमन करण्यासाठीं;

(फ) ह्या आक्टाअन्वयें गिरण्यांच्या मालकांनीं कोणते कागदपत्र व जमा-खर्चाच्या वह्या ठेवावयाच्या तें ठरविण्यासाठीं;

(ग) ज्या शरतींवर मात्र १९ व्या व २१ व्या कलमाअन्वयें जकात माफ करण्यांत येईल आणि ड्राब्याक देतां येईल त्या शरती ठरविण्यासाठीं;

(ह) साधारणतः, ह्या आक्टांतील ठराव अमलांत आणण्याच्या कारणांसाठीं.

(२) सदर्हू प्रकारच्या कोणत्याही कानूंत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जागेस किंवा जागांस मात्र ती कानू लागू करण्याचा अधिकार आहे.

---

## भाग २.

### देशांतील कस्टम्सची जकात.

पारक्या मुलुकांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत येणाऱ्या कापसाच्या मालावर जकात घेण्याबाबद.

३७. (१) ह्यानंतर ह्या कलमांत दिलेल्या अधिकाराअन्वयें जो कोणताही मुलुक पारका मुलुक आहे असें ठरविण्यांत येईल, त्या मुलुकांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत येणाऱ्या कापसाच्या मालावर सन १८९४ च्या हिंदुस्थानच्या तारिफाच्या आक्टांत त्या त्या वेळीं ठरविलेल्या दरांनीं कस्टम्सची जकात घेण्यांत येईल.

(२) ब्रिटिश हिंदुस्थानच्या आंत किंवा त्याच्या सरहद्दीवर असलेला परंतु ब्रिटिश हिंदुस्थानाचा भाग नसलेला कोणताही मुलुक ह्या कलमाच्या कारणांसाठीं पारका मुलुक आहे असें इंडिया गझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस अधिकार आहे.

(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, वेळोवेळीं, इंडिया गझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, अशा कोणत्याही पारक्या मुलुकांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत कापसाचा माल आणण्याची मनाई करण्याचा अगर आणण्याच्या कामावर निर्बंध ठेवण्याचा अगर फक्त ज्या रस्त्यानें तो आणितां येईल, ते रस्ते ठरविण्याचा अधिकार आहे.

(४) अशा कोणत्याही जाहीरनाम्याच्या विरुद्ध ब्रिटिश हिंदुस्थानांत आणिलेल्या किंवा आणण्याचा प्रयत्न केलेल्या सर्व मालास मुख्य आक्टाच्या १९ अ ह्या कलमांतील ठराव लागू होतील.

मुख्य आक्टाचे ड्राब्याक संबंधाचे ठराव, ह्या भागाअन्वयें कर आकारलेल्या मालास लागू करण्याबाबद.

३८. निर्गत केलेल्या मालाच्या संबंधानें मिळणाऱ्या ड्राब्याकसंबंधाचे मुख्य आक्टाचे ठराव, ज्या कोणत्याही मालावर ह्या भागाअन्वयें जकात दिलेली असेल, त्या सगळ्या मालास लागू होतील.

---

## भाग ३.

### हंगामी ठराव.

गिरण्यांतलें जें सूत तारीख २३ जानेवारी १८९६च्या आधीं बनवलेलें असेल, खरेदी केलेलें असेल अगर आयात केलेलें असेल त्या सुताबद्दल ड्राब्याक.

३९. जर कोणत्याही गिरणीच्या मालकाजवळ, त्याच्या गिरणीमध्यें, ह्या आक्टाच्या सुरुवातीच्या वेळेस कोणतेंही सूत असून, तें सूत तारीख २३ माहे जानेवारी सन १८९६ च्या आधीं—

(अ) सन १८९४ चा कापसाच्या मालावरील जकातीबाबद आक्ट, कलम ९, ह्याच्या खुलाशाच्या (ब) रकमेच्या अर्थाअन्वयें त्याच्या गिरणींत तयार केलेलें असेल, अगर

(ब) सदर्हू खुलाशाच्या (क) रकमेच्या अर्थाअन्वयें दुसऱ्या एखाद्या गिरणीच्या मालकानें तयार केल्यानंतर त्यापासून, खरेदी करून अगर खात्यावर लिहून घेतलेलें असेल; अगर

(क) आयात केलेलें असेल आणि त्यावर कस्टम्सची जकात दिलेली असेल,

आणि तें, ह्या आक्टाच्या सुरवातीच्या आधीं ह्या आक्टाच्या अर्थाअन्वयें बनवलेल्या कोणत्याही मालपैकीं नसेल, तर सन १८९४ चा कापसाच्या मालावरील जकातीबाबदचा आक्ट ह्याअन्वयें अगर सन १८९४ चा हिंदुस्थानचा तारिफाबाबद आक्ट ह्याअन्वयें अशा सुताबद्दल जकातीची जी रकम दिल्याविषयीं कलेक्टरची खातरी होईल अशा रीतीनें तो मालक शाबिती करील त्या रकमेहून ज्यास्त नाहीं इतकी रकम, हा आक्ट पसार झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आंत कोणत्याही वेळीं अशा सुतापासून तयार केलेल्या मालाबद्दल द्यावयाच्या जकातीच्या रकमेंतून बाद मिळण्याचा त्याचा हक्क असेल.

परंतु असें ठरविलें आहे कीं, सदहू सूत फक्त कांठांसाठीं वापरलेलें नसलें पाहिजे.

४०. (१) गिरणीच्या ज्या कोणत्याही मालकाच्या मनांत कलम ३९ अन्वयें ड्राब्याक मागावयाचा असेल, त्यानें हा आक्ट पसार झाल्यानंतर एका आठवड्याच्या आंत, खालीं सांगितलेला सर्व तपशील ज्यांत लिहिलेला आहे असें एक पत्रक कलेक्टराच्या स्वाधीन केलें पाहिजे:— *कलम ३९ अन्वयें ड्राब्याक मागण्याची रीत.*

सदहू कलमाच्या (अ) व (ब) रकमांच्या संबंधानें, सुताचें परिमाण व कौंट, आणि सांगतां येईल तेथपर्यंत, त्याचा ज्या मासिक पत्रकांत समावेश केलेला असेल तें पत्रक;

सदहू कलमाच्या (क) रकमेच्या संबंधानें, सुताचें परिमाण व कौंट आणि त्यावर आयात जकात ज्या तारिखेस दिलेली असेल, ती तारीख व ती दिल्याचा तपशील.

(२) अशा पत्रकावर गिरणीच्या मालकानें आपली सही करून तें खरें असल्याबद्दल शेरा लिहिला पाहिजे; आणि तें बरोबर आहे किंवा नाहीं त्याबद्दल, तें तपासून अगर इतर रीतीनें आपली खात्री करून घेण्याचा कलेक्टरास अखत्यार आहे.

(३) ज्या सुताच्या बाबतींत ड्राब्याक मागितलेला असेल, त्या सुताचा समावेश ह्या कलमाअन्वयें तयार केलेल्या पत्रकांत केलेला नसल्यास कलम ३९ अन्वयें कोणताही ड्राब्याक दिला जाणार नाहीं.

४१. (१) जो कोणताही माल, ह्या आक्टाच्या सुरुवातीच्या वेळेस, कोणत्याही गिरणीच्या जागीं असून जो त्यावर आणखी कांहीं क्रिया करण्यांत आल्याशिवाय अगर त्याचे गठ्ठे अगर पुडक्यीं बांधल्यानंतर त्या गिरणींतून बाहेर पाठविला जाण्यास तयार असेल त्या मालाबद्दल ह्या आक्टाअन्वयें कोणतीही जकात घेतली जाणार नाहीं. *तयार असलेल्या मालाबद्दल ठराव.*

परंतु असें ठरविलें आहे कीं, अशा मालाची यादी, हा आक्ट सुरू झाल्यानंतर सात दिवसांच्या आंत तयार करून कलेक्टराकडे दिली पाहिजे.

(२) असा माल बनवल्याच्या संबंधाचें जें जें पत्रक ह्या आक्टाच्या ८ व्या कलमाअन्वयें तयार करण्यांत येईल, तें तें पत्रक इतर मालाच्या पत्रकांहून निराळें असलें पाहिजे.

४२. सन १८९४ चा कापसाच्या मालावरील जकातीबाबद आक्ट ह्याच्या ७ व्या कलमाअन्वयें ठरविलेलें जें सुताचें पत्रक, सदरहू आक्ट रद्द झाला नसता तर तारीख १९ फेब्रुआरी १८९६ रोजीं अगर त्याच्या आधीं कलेक्टराकडे द्यावें लागलें असतें, तें पत्रक तो आक्ट अद्याप अमलांत असल्याप्रमाणें तयार करून रुजू केलें पाहिजे; परंतु तारीख २३ जानेवारी सन १८९६ रोजीं अगर त्यानंतर बनविण्यांत आलेल्या कोणत्याही सुताबद्दल जकात आकारण्यांत किंवा वसूल करण्यांत येणार नाहीं. *सन १८९४ चा आक्ट १७ वा कलम ७ ह्या खालील पत्रक सन १८९६ च्या फेब्रुआरी महिन्यांत स्वाधीन केलें पाहिजे; परंतु तारीख २३ जानेवारी १८९६ रोजीं अगर त्यानंतर बनाविलेल्या सुतावर जकात पडणार नाहीं.*

(सही) एस्. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

---

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

---

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीं जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८९६ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

---

## सन १८९६ चा आक्ट ६ वा.

---

### हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा सुधारण्याबाबद आक्ट.

ज्याअर्थीं हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून येणेंप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

सदरहू कायद्याच्या २३० व्या कलमाच्या २ ऱ्या पारिग्राफाबद्दल नवीन पारिग्राफ दाखल करणें.

१. (१) सदरहू कायद्याच्या २३० व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफाबद्दल खालील पारिग्राफ दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:—

"राणीसाहेबांचें नाणें ह्मणजे राणीसाहेबांनीं दिलेल्या अखत्यारावरून, अगर इंडिया सरकारानें, अगर कोणत्याही इलाक्याच्या सरकारानें, अगर राणीसाहेबांच्या राज्यांतील कोणत्याही सरकारानें दिलेल्या अखत्यारावरून, पैका ह्मणून उपयोग करण्यासाठीं, पाडलेलें व चालू केलेलें जें धातूचें नाणें तें होय; आणि याप्रमाणें पाडलेल्या व चालू केलेल्या धातूच्या नाण्याचा पैका ह्मणून उपयोग करण्याचें बंद झालेलें असलें तरी, तें या बाबीच्या कारणासाठीं राणीसाहेबांचें नाणें असण्याचें चालू राहील."

(२) सदरहू कलमांस जोडलेल्या उदाहरणांच्या शेवटीं खालील उदाहरण जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

"(९) 'फरक्काबादी रुपया,' ज्याचा इंडिया सरकारच्या हुकुमावरून पैका ह्मणून पूर्वीं उपयोग करण्यांत येत होता, त्याचा त्याप्रमाणें आतां उपयोग करण्यांत येत नाहीं तरी, तो राणीसाहेबांचें नाणें होय "

एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८९६ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९६ चा आक्ट ७ वा.

**सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉलकॉज कोर्टांसंबंधी आक्ट सुधारण्याबाबदचा आक्ट.**

ज्याअर्थीं सन १८८२ चा इलाक्यांतील स्मॉलकॉज कोर्टांसंबंधी आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून येणेंप्रमाणें ठरविलें आहे:—

१. सदरहू आक्टाच्या ७१ व्या कलमांतील "अडतीस अगर" हे शब्द रद्द केले आहेत. सन १८८२ चा आक्ट १५, याच्या ७१ व्या कलमाची सुरणा.

एस्. हार्व्हे जेम्स,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.